# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७ / (३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

## क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५

जावक क्र./गों.वि.ग./क्री.शा.शि./ 641 /2026 दिनांक : 10/02/2026

प्रति,

- ✓ मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
- ✓ मा. सर्व विभाग प्रमुख, प्रशासकीय / शैक्षणिक विभाग, गों. वि. गडचिरोली
- ✓ सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी, सर्व संलग्नीत महाविद्यालये व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :- अमृत क्रीडा व कला महोत्सव -2026, क्रीकेट स्पर्धेचे फेरिपत्रक** (सुधारित तारखांसह)..

संदर्भ :- 1) या कार्यालयाचे सुचना पत्र क्र. 639/2026, दिनांक 09/02/2026


उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येत आहे की, दरवर्षीप्रमाणे **अमृत क्रीडा व कला महोत्सवा**चे आयोजन गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे **दि. 16 ते 18 फेब्रुवारी, 2026** दरम्यान करण्यात आलेले आहे. सदर महोत्सवातील क्रीकेट स्पर्धेकरीता विविध महाविद्यालयांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या संघांनी विद्यापीठाकडे नोंदणी केलेली असून क्रीकेट सामन्यांचे फेरिपत्रक (Fixture) खालीलप्रमाणे आहेत. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**स्पर्धेचा कालावधी** : **दि. 16 ते 18 फेब्रुवारी, 2026**

**स्पर्धेचे स्थळ** : **मॉडेल डिग्री कॉलेज, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**क्रिकेट स्पर्धा फेरिपत्रक पुढीलप्रमाणे -**

1) जनता महाविद्यालय, चंद्रपूर (Bye)
2) श्री. ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव
3) गों. विद्यापीठ, गडचिरोली (**श्री. उराडे**)
4) गों. विद्यापीठ, गडचिरोली (**श्री येसेकर**)
5) एस.आर.एम. महाविद्यालय, पडोली
6) मो. जव्हेरी महाविद्यालय, वडसा (Bye)
7) महात्मा गांधी महाविद्यालय, गडचांदूर (Bye)
8) गों. विद्यापीठ गडचिरोली (**श्री. आसुटकर**)
9) श्री. शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली
10) चिंतामणी महाविद्यालय, पोंभुर्णा (Bye)
11) आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा (Bye)



## क्रिकेट स्पर्धा — सुधारित नियम व अटी

1. सदर स्पर्धा खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेनुसार आयोजित करण्यात येईल. आवश्यकतेनुसार वेळापत्रकात बदल करण्याचा पूर्ण अधिकार आयोजकांकडे राहील.

| सामना क्रमांक | सामन्यांचा दिनांक व वेळ | | | सामना क्रमांक | सामन्यांचा दिनांक व वेळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | | दिनांक | वेळ |
| 1 | 16/02/2026 | सकाळी 8.00 | | 6 | 17/02/2026 | सकाळी 9.00 |
| 2 | 16/02/2026 | सकाळी 10.00 | | 7 | 17/02/2026 | सकाळी 11.00 |
| 3 | 16/02/2026 | दुपारी 2.30 | | 8 | 17/02/2026 | दुपारी 2.00 |
| 4 | 16/02/2026 | दुपारी 4.30 | | 9 | 17/02/2026 | दुपारी 4.00 |
| 5 | 17/02/2026 | सकाळी 6.00 | | 10 | 18/02/2026 | सकाळी 6.00 |

2. वरील फिक्स्चरप्रमाणे (क्रमांक 1 ते 10) सामने आयोजित करण्यात येतील. प्रत्येक संघाने नियोजित सामन्याच्या किमान 1 तास आधी मैदानावर प्रत्यक्ष उपस्थित राहून रिपोर्टिंग करणे बंधनकारक राहील. अनुपस्थित राहिल्यास संबंधित संघ बाद ठरविण्यात येईल.
3. संपूर्ण क्रिकेट स्पर्धा ही **हेवी टेनिस बॉल** वापरून खेळविण्यात येईल.
4. सर्व लीग सामने 08 षटकांचे असतील. उपांत्य व अंतिम सामने 10 षटकांचे असतील. परिस्थितीनुसार षटकांमध्ये कपात अथवा वाढ करण्याचा अधिकार आयोजकांकडे राखीव राहील.
5. प्रत्येक संघाने स्वतःचे बॅट तसेच आवश्यक खेळसाहित्य स्वतः सोबत आणणे अनिवार्य आहे.
6. प्रत्येक संघातील खेळाडूंनी महाविद्यालय / विद्यापीठाचे मूळ ओळखपत्र तसेच आधार कार्ड सोबत ठेवणे बंधनकारक आहे. नियमबाह्य अथवा अपात्र खेळाडू आढळल्यास संबंधित संघ बाद ठरविण्यात येईल.
7. विद्यापीठाकडे नोंदणी केलेल्या खेळाडूंनाच संघामध्ये सहभागी होण्याची परवानगी असेल.
8. पंचांचा निर्णय अंतिम व सर्व संघांवर बंधनकारक राहील.
9. प्रत्येक खेळाडूने खेळ भावना जपून, शिस्तबद्ध पद्धतीने खेळ करणे आवश्यक आहे.
10. मद्यपान, धूम्रपान किंवा कोणत्याही प्रकारच्या व्यसनास सक्त मनाई असून, उल्लंघन केल्यास प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.
11. खेळादरम्यान होणाऱ्या दुखापतीस आयोजक जबाबदार राहणार नाहीत. खेळाडूंनी स्वतःच्या सुरक्षिततेची दक्षता घ्यावी. दुखापत झाल्यास संबंधित खेळाडू स्वतः जबाबदार राहील.
12. विद्यापीठामार्फत नियुक्त परीक्षकांच्या देखरेखीखाली सामने खेळविण्यात येतील. परीक्षक / स्पर्धा प्रमुखांनी सामन्याचा अहवाल वेळोवेळी क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्याकडे सादर करावा.

**डॉ. अनिता लोखंडे**
संचालक (प्र.), क्रीडा व शा. शिक्षण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव -

1) मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
2) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
3) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली